-प्रास्ताविक-

डॉ.गणेश हरी खरे हे महाराष्ट्रातील एक प्रसिध्द इतिहास संशोधक म्हणून ओळखले जातात. इतिहास संशोधनाच्या क्षेत्रात एक स्वावलंबी व विविधांगी संशोधक म्हणून त्यांचे वैशिष्ठ्यपूर्ण स्थान आहे. महाराष्ट्रात वि.का.राजवाडे, वासुदेवशास्त्री खरे, रावबहादुर द.ब.पारसनीस, गो.स. सरदेसाई, गणेश चिमणाजी वाड, त्र्यं. श.शजवलकर, दत्तो वामन पोतादार, न्या.रानडे वगैरे नामवंत व निष्ठावंत इतिहास संशोधकांनी मराठी इतिहास लेखनाचा व ऐतिहासिक साधने संकलित करण्याची थोर आणि उज्वल जी परंपरा निर्माण केली त्या परंपरेतील ग. ह.खरे हे शेवटचे इतिहाससंशोधक मानले जातात.

काटेकोरपणा व शास्त्रशुध्दपणा हे त्यांच्या लेखनाचे वैशिठ्य होय. इतिहास संशोधनपध्दती संबंधी श्री.खरे यांनी आपले विचार विविध ग्रंथाच्या प्रास्तावनेमधून अत्यंत मार्मीकपणे मांडले आहे. प्रचलीत इतिहास संशोधनपध्दतीतील उणीवा व दोष त्यांनी आपल्या अनेक लेखातून दाखवून दिले आहे. इतिहास संशोधनाच्या क्षेत्रात नवीन अभ्यासक पुढे यावयास हवेत. नाही तर संशोधन संस्थाच्या केवळ इमारती उभ्या राहतील आणि पुजारी नसलेल्या देवळासारखी त्यांची स्थिती होईल असे विचारही त्यांनी अनेक ठिकाणी व्यक्त केले आहेत.

ग.ह.खरे यांनी आपले संपूर्ण आयुष्य मराठी इतिहासाच्या अभ्यासासाठी खर्ची घातले. त्यांनी संपूर्ण भारतभर फिरून असंख्य जुनी कागदपत्रे, शिलालेख, ताम्रपट, नाणी, चित्रे, जुन्या पोथ्या इत्यादी गोळा करून भारत इतिहास संशोधन मंडळ पुणे या ठिकाणी संकलीत करून ठेवलेले आहेत. ते एक पहिल्या प्रतिचे इतिहास साधनाचे संग्राहक म्हणून परिचीत आहेत.

त्याचबरोबर त्यांनी विपुल प्रमाणात प्राचीन मध्ययुगीन विशेषत: मराठ्यांच्या इतिहासावर अंदाजे ५० ते ६० पुस्तके व ४०० ते ५०० लेख लिहून ख-या अर्थाने संशोधकांचे मित्र ठरले. मराठी इतिहास अभ्यासाचे ते एक चालते बोलते - ज्ञानकोशच होते. त्यांनी अनेक इतिहासपरिषदा सभा चर्चा सत्रामध्ये भाग घेवून आपले सडेतोड विचार व्यक्त केले.

अशा या थोर इतिहाससंशोधकाचे मराठी इतिहासलेखन शास्त्रातील स्थान ठरविण्याचा व त्यांनी केलेल्याकार्याचा आढावा, आजपर्यंत त्यांचे लिखाण उपलब्ध आहे. त्यांच्या आधारे घेण्याचा मी या ठिकाणी प्रयत्न केला आहे.

मी वरील विषयावर अभ्यास करीत असताना मला अनेक व्यक्ती,संस्था, ग्रंथालये इत्यादींकडून सहकार्य मिळाले. त्या सर्वांचे आभार मानणे मी माझे कर्तव्य समजतो. प्रथमत: शिवाजी विद्यापिठातील इतिहास विभाग प्रमुख डॉ. बी.आर. कांबळे यांनी मला " ग.ह.खरे चरित्र व कार्य " हा विषय देवून त्यावर प्रबंध लिहा असे सुचविले व वेळोवेळी मार्गदर्शन केले म्हणून मी त्यांचा आभारी आहे.

माझे मार्गदर्शक डॉ.बी.डी.खणे यांनी मला वेळोवेळी मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे व सहकार्यामुळे मी हा प्रबंध वेळेत पूर्ण करु शकलो म्हणून मी त्यांचा अत्यंतऋणी आहे.

आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य य.ना.कदम यांनी मला एम.फील.चा कोर्स पूर्ण करण्याची संधी दिली व वेळोवेळी प्रोत्साहन दिले म्हणून मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. तसेच सांगोला तालुका उच्च शिक्षण मंडळाचे अध्यक्ष,सेक्रेटरी व सर्व पदाधिकारी व सदस्यांचेही आभार मानतो.

तसेच प्राध्यापक ग.ल.भीडे दयानंद महाविद्यालय सोलापूर, यांनी मला वेळोवेळी सहकार्य तर केलेच पण माझ्या कार्यात प्रोत्साहन दिले म्हणून मी त्यांचा कृतज्ञ आहे.

ग.ह.खरे यांचे संपूर्ण लिखाण मला भारत इतिहास संशोधन मंडळात उपलब्ध झाले त्यामुळे माझे काम मी वेळेत पूर्ण करू शकलो म्हणून मी श्री.जी.टी.कुलकर्णी, सेक्रेटरी भारत इतिहास संशोधन मंडळ पुणे यांचे व मंडळाच्या इतर पदाधिका-यांचे आभार मानतो. तसेच ग.ह.खरे यांचा पुतण्या सुधीर खरे यांनीही मला तात्यांच्या संबंधी माहीती पुरविली व सहकार्य केले, त्याबददल मी त्यांचाही आभारी आहे. केसरी व सकाळमधील ग.ह.खरेंचे लेख उपलब्ध करून दिल्याबददल केसरीचे ग्रंथपाल श्री.प्र.ग. फणसळकर व सकाळचे ग्रंथपाल श्री.सु.ब.जाधव यांचे आभार मानतो. तसेच डेक्कन रिसर्च इन्स्टीटयुटचे पुणे, या कॉलेजचे ग्रंथपाल व शिवाजी विद्यापीठाचे ग्रंथपालांनी केलेल्या सहकार्याबददल त्यांचेही आभार मानतो.

माझी पत्नी सौ.श्रीदेवी बिराजदार हिच्या सहकार्याबददल तिचेही आभार मानतो तसेच माझे मित्र व सहकारी प्रा.बी.एच.कुलकर्णी यांनीही मला सहकार्य केले म्हणून त्यांचेही आभार मानतो. या प्रबंधासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत करणा-या सर्व मित्रांचे व सहकार्यांचे मी मन:पुर्वक आभार मानतो.

या प्रबंधात केलेल्या विधानाशी व त्यात कांही चुका असल्यास त्यास मी व्यक्तीश: जबाबदार आहे.

स्थळ - कोल्हापूर.
दिनांक - ( व्ही.जी.बिराजदार )

. . . . .